म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय निबंध
दा क्र ५

IRBK-0100005

IRBK-0100005
IRBK-0100005

# आरंभीं दोन शब्द

पुष्कळ दिवसांपासून मनांत होतें कीं, वृद्धपणीं लग्न करण्यापासून कसे कसे अनर्थ घडतात याबद्दल एक लहानसें पुस्तक लिहावें व त्यांत युरोपखंडांतील व आपल्या देशांतील कांहीं माहिती द्यावी.

सांप्रत 'शारदा नाटक' वगैरे कांहीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत व त्यांचे खेळ मोठमोठे शहरीं होतात; पण खेड्यापाड्यांत, तालुक्याच्या गांवीं ते खेळ होत नाहींत. अशा गांवचे लोकांनीं या संबंधानें कसे यत्न करावे हें या पुस्तकांत थोडक्यांत सांगितलें आहे.

जर या पुस्तकापासून थोडेंसें हित झालें तर माझ्या यत्नाचें सार्थक झालें असें मी समजेन.

वसई,
ता. १-१२-१९०१. } गोविंद बाबाजी जोशी.

निबंध

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

IPBK-0100005

IRBK-0100005

# अनुक्रमणिका.

विषय. पृष्ठ.


१ नवरदेव होऊं इच्छिणारे ह्यातारे गृहस्थास पाठविण्याचें पत्र .... .... .... १–१०

२ युरोपचे इतिहासांतील कांहीं हकिकत.... ११–१४

४ भारत ग्रंथांचें सार. .... .... .... १५–२३

४ वृद्धपणीं लग्न करूं इच्छिणाऱ्या ह्याताऱ्याचें मन परावृत्त होण्यास गांवकऱ्यांनीं कसा यत्न करावा..... .... .... २४–२५

५ दोन ह्याताऱ्यांचे लग्नाची चमत्कारिक हकिकत. .... .... .... .... २६

६ कविता, ह्याताऱ्या नवऱ्याचा तरुण पत्नीचे सहवासाचा अनुभव. .... .... २७–२८

७ कविता, तरुण पत्नीचा ह्यातारे नवऱ्याचे सहवासाचा अनुभव. .... .... २९–३०

# नवरदेव होऊं इच्छिणारे ह्मातारे गृहस्थास पाठविण्याचें पत्र.

रा. रा. ..........................

मि. ..........................

विनंति—तुह्मीं आपल्या वयाकडे न पाहतां लग्न करण्याची तजवीज चालविली आहे हें ऐकून फार फार वाईट वाटतें. हिंदुशास्त्राप्रमाणें लग्न ह्मणजे जन्माचें बंधन. एकदा तें बंधन जोडलें गेलें ह्मणजे मग जन्मपर्यंत सुटत नाहीं. याकरितां अशीं कृत्यें करतांना उतावळपणा अगदीं उपयोगाचा नाहीं. याचा तुह्मीं अगदी विचार करित नाहीं. आणि "उतावळा नवरा व गुढग्याला बाशिंग" अशी वर्तणूक करितां हा मोठा चमत्कार आहे.

कोणतेंही विशेष जोखमाचें काम करते वेळीं पुष्कळ लोक आपल्या स्नेह्यांस व इष्टमित्रांस विचारून मग अशा कामांत पडतात. त्याप्रमाणें आपण वागलां असाल असें आह्मांस वाटत नाहीं. कारण खरा मित्र तुह्मांला लग्न करण्याविषयीं कधींही मत देणार नाहीं.

पन्नाशी उलटून गेल्यावर विषयोपभोगाची किती तरतरी पुरुषांत राहते, याचें तुह्मीं आपले मनाशी चांगलें मनन करा, यौवन दशा पावलेल्या स्त्रियांस वृद्धपतीपासून सुख होत नसल्यामुळें स्त्रिया कशा पापाचरणाला प्रवृत्त होतात, आणि त्या योगें पतीस पुढें पावलों पावलीं कशी गैरअब्रु सहन करावी लागते याचीं उदाहरणें खुद्द तुमचे गांवचीं व आसपासचे गांवचीं तुह्मांस माहित नसतील असें नाहीं.

पत्नीचा यौवन दशेस चढलेला सूर्य आपल्या तेजोमय प्रभेनें मध्याकडे येत असतो, ह्मणजे भर ज्वानीचीं सर्व चिन्हें पत्नीचे मुखावर खुलत असतात, आणि तिकडे पतीकडे पाहिलें तर त्याचा 'भानु' भ्रमण करित करित अस्ताचलाकडे मावळण्यास जात असतो आणि त्या योगें त्याचे तोंडावर ( जरेमुळें ) प्रेतकळा दिसत असते.*

त्यायोगें थोडक्यांत सांगितलें तर दोघांत अगदीं "तिर-पगडें" होऊन राहतें. ( यास गुजराथी भाषेंत "कजोडा"

---

***मोरोपंतांनीं वृद्ध पुरुषाचे स्थितीविषयीं एक्या केकेंत वर्णन केलें आहे तें असें**-म्हातारा, देवास म्हणतो, ॥ कृतांत कटकामलध्वज जरा दिसों लागली ॥ पुरस्सर गदासवें झगडतां तनु भागली ॥ सहाय दुसरा नसे तुजविणें बळें आगळा ॥ नहीं जरि उतावि‍ळा स्वरिपु कापितो हा गळा ॥ १ ॥ कृतांत म्हणजे ( यमधर्म ) याचे लष्कराची विमलध्वजा ( निशाण जें लष्करापुढें सर्व काळ चालत असतें)तिनें माझे शरीरावर अमल केला आहे म्हणजे म्हातारपणामुळें सर्व केंस पांढरे झाले आहेत. त्याच प्रमाणें **यमाचे** सरदार रोगादिक (आंगांत वारा मारणें, खोकला होणें, सर्व अवयवांनीं आपलीं कामें बराबर न करणें, सांधे धरणें इ० ) त्यांचे आधीन माझें शरीर होत चाललें आहे. तर हे **देवाधि देवा** तुझे चरणापाशीं मला लौकर घेऊन जा, असा या केकेचा अर्थ आहे. ह्मातारे बाबा, या अर्थाशीं तुमचें शरीर कितपत मिळतें आहे याचें मनन करा, यमाची विमल ध्वजा, ह्मणजे केंस पिकणें, त्याच प्रमाणें शरीरांत वायूचा जोर होणें, सांधे धरणें, खोकला होणें, निजते वेळीं उशाशी करवंटी ठेवावी लागणें, याच्याशीं तुमची शरीरप्रकृति मिळती झाली आहे काय, याचेंही मनन करा आणि मग लग्नाची उठाठेव करा.

हा अगदीं बरोबर शब्द आहे) आणि त्या योगें पुढें गांवकऱ्यांच्या व उनाड पोरांच्या उपहासास मात्र तें दंपत्य प्राप्त होतें. पतीस वाटतें कीं पत्नीनें मजपाशीं वारंवार यावें, हास्य वदनानें मजकडे पाहावें, गोड गोड बोलावें, पण त्या बालपत्नीस त्याची ती इच्छा विषासमान वाटत असते. साधारण नियम या ( बालावृद्धा ) दंपत्यांत असा असतो कीं, पत्नी जों जों त्याचा अव्हेर करित असते, तों तों म्हातारा पती ज्यास्तच लाडी गोडी लावण्यास पुढें पुढें जात असतो आणि पत्नी त्याचा धिक्कार करित असते. तीस त्या म्हाताऱ्याचे अंगाची बुरसट घाण अगदीं सहन होत नसते; तो जर माजघरांत आला तर ती स्वैंपाक घरांत किंवा मागील दारीं जात असते; असे लपंडाव चालतात. भिक्षुकी किंवा रोजगार धंद्यामुळें जर म्हाताऱ्यास बाहेर गांवीं राहणें भाग असलें, तर तो रविवार अगर सवड केव्हां येईल, हें पाहून मोठे हुरूपीनें घरीं येतो, पण बालपत्नीस तो मोरोपंताचे आर्ये प्रमाणें "आला कीं काय काळसा वाटे" असा प्रकार होतो. थोडक्यांत सांगितलें तर माकडाचे तमाशांतील 'देवजी धसाड्या' आणि 'रत्नी पोरी' प्रमाणें मग दोघांत माकडचेष्टा चालतात. कांहीं ठिकाणीं या रात्रंदिवसाचे त्रासास कंटाळून उच्छृंखळ पोरी निघून गेल्याचीं उदाहरणें वर्तमानपत्रांत वारंवार वाचण्यांत येतात.

पतीचे अंगीं त्याचे वयाप्रमाणें पोक्तपणा आलेला असतो, व त्या प्रमाणें त्याचें वर्तन घरांत बाहेर सभ्यपणाला धरून असतें; पण इकडे पत्नीकडे पाहिलें तर सर्व प्रकार अगदीं उलट असतो; घरांत सासु असली, तर कांहींसें वळण

लागण्याचा संभव असतो. बाळपणाचे धावरे स्वभावास थोडीशी अटक राहते, पण अशा स्थळीं ह्मणजे ह्मातान्या नवऱ्याच्या घरचीं सर्व वडील माणसें श्राद्धपक्षाशिवाय घरीं राहतच नसल्यामुळें दाब ठेवणारें, मायेचें कोणी नसावयाचें, कदाचित् कांहीं दूरदूरची मंडळी असली तर ती आश्रित किंवा परकी असल्यामुळें कार्यसाधु आणि बाईसाहेबांचे शब्द झेलणारी अशीच असावयाची. त्यामुळें त्याच्या ह्मणजे ह्मातान्या नवऱ्याच्या संसाराची पुढें फारच दुर्दशा होते.

पतीस वाटतें कीं, माझे पत्नीनें वारंवार ओटीवर, दिवाणखान्यांत जाऊं नये, परक्यांशीं फारसें बोलूं नये, शेजाऱ्याच्या मुलांशीं वारंवार बोलूं नये, त्यांच्या तोंडाकडे पाहूं नये, खिदळूं नये, रस्त्यांतून चालतांना खालीं मान घालून चालावें, पदर, ओंचा, जेथच्यातेथें असण्याविषयीं काळजी घ्यावी. इ० इ०

पण इकडे पाहिलें तर पत्नीचा बालपणा समाप्त जालेला नसतो. तशांत ती हलके कुळांतून आलेली असल्यामुळें तिचा सर्व कांहीं प्रकार माहेरच्या वळणाप्रमाणेंच असावयाचा. एखादे बारा पंधरा वर्षांचे मुलास सांगितलें कीं, बाळा, तुझे अंगीं ( किनई ), चाळीस पन्नास वर्षांचे पुरुषाप्रमाणें पोक्तपणा येऊं दे, तर तसें होईल काय ? तोच प्रकार या पोक्त नवऱ्याचे बालपत्नीचा असावयाचा.

तशांत अशा बिजवरास आणि त्यांत पन्नाशीच्या किंवा साठीच्या घरांत आलेल्या ( जरठ ) नवरदेवास आपली मुलगी देणारा कुलवान् असेल काय ? छी, छी, कुलवान् गृहस्थ असें ( कसायाचें ) काम कधींही करणार नाहीं.

तर अगदीं हलका, नीच कुळांतीलच ' खाटीक ' पोटचा गोळा विकून धनाची आशा करणारा असावयाचा. अशा हलक्या कुळांत मोठ्या झालेल्या मुलीचे अंगीं पतीच्या प्रौढ घराण्याचें सभ्यपण कसें यावें ? कधींही यावयाचें नाहीं. आणि त्या मुळें पत्नीस पतीनें केलेला उपदेश मुळींच ठसत नाहीं यांत नवल तें कोणतें ? तिला तें पतीचें बोलणें चमत्कारिक वाटतें आणि त्या योगें ' मूर्खाला काहाणी ' असा उपदेशाचा परिणाम होतो.

वारंवार उपदेश केला, एकांतांत समजूत घालून पाहिली, गोडी गुलाबीनें सांगितलें, पण समजूत कशी ती अगदीं पडत नाहीं; असा, नवऱ्यास अनुभव आला, ह्मणजे मग त्याचे अंगाचा ' तिळपापड ' होतो. मग तो बायकोचा दांडगेपणा पाहून मनांत सार्वकाळ जळत असतो. त्यास हलके कुळांतील मुलीशीं लग्न केल्याबद्दल पश्चात्ताप होतो; फार वाईट वाटतें. पण आतां उपयोग काय ? पाणी प्याल्यावर कां घराचा तपास करावयाचा ? " जाती तशी पुती आणि खाण तशी माती " याप्रमाणें आईबापाचे वळणावर ती मुलगी जावयाचीच. सासरीं जरी तिला पोटभर अन्न खावयास मिळालें, तरी उनाड ढोराप्रमाणें ओटींत पोहे घेऊन ती ' फक्या ' मारावयाचीच; माहेरचे वळणाप्रमाणें तिचें वर्तन असावयाचें; पतीनें वेळोवेळ केलेला उपदेश तिला मुळीं समजावयाचा नाहीं, इतकेंच नाहीं, तर तो तिला विषासारखा वाटत असावयाचा. यामुळें पुढें ती निगरगट्ट, व कोडगी कांहीं काळानें व्हावयाची. तिचा सर्व ओढा माहेरचें घर भरण्याकडे असावयाचा, माहेरचें कोणी

आल्यास घरांतील हवी ती वस्तु गुप्त रीतीनें देण्यास ती कधीं चुकावयाची नाहीं. पतीचें पाणी मग ती जोखून टाकिते; नवरा रागावला, तरी मग ती त्याची फारशी पर्वा करीत नाहींशी होते; सांगितलेलें ऐकत नाहीं, अलीकडे ये ह्मटलें तर पलीकडे जाते, तोंडास तोंड देते, असें झालें ह्मणजे मग नवऱ्यास वारंवार राग येऊं लागतो; त्यास सुचत नाहींसें होतें. त्याला "सशी मिरें" लागतात. असें होतां होतां दोघेंही तमोगुणी असलीं तर दांडपट्टा सुद्धां खेळतात. 'दादाचें बळ वहिनीला माहीत' या ह्मणीप्रमाणें एकमेकांस पुरा अनुभव असला तर दोघांत कुस्त्या सुद्धां होतात. असें वारंवार होऊं लागलें, दररोज घरांत दारांत बोलाचाल्या, तंटे, होऊं लागले ह्मणजे मग शेजारी पाजारी, सोयरे धायरे मध्यस्ती करण्यास, दोघांची समजूत घालण्यास, येऊं लागतात. माहेरचीं माणसें मग ह्यातान्या नवऱ्याची जास्त 'ढवढव' लोकांत करितात. त्यायोगें पोरीस फूस चढते; ती मग नवऱ्यास न विचारतां माहेरीं किंवा हवी तिकडे जाऊं लागते. अशाप्रकारें दोघांत कोपाग्नी वाढत जातो. जास्त प्रसंग झाला, रक्त निघालें, डोकें फुटलें, तर पोलिसालाही कधीं कधीं तसदी घ्यावी लागल्याचीं उदाहरणें मोठमोठे शहरीं पुष्कळ घडतात. असें होतां होतां दोघांत पटेनासें होतें. वैर, द्वेष वाढत असतो, तो आसपासचे लोकांस दिसत नसतो. आजू बाजूच्या बदफैली लोकांच्या गुप्त ओळखी त्या पोरीशीं होतात. याचा परिणाम शेवटीं दोघांत "गडीफूचा" होऊन मग ती नवऱ्याचे हातावर तुरी देऊन अंगावरील डागिन्यांसह व संधी साधल्यास घरांत हात मारून

पळून जाते; पण एखादी गरीबशी असली तर या त्रासांतून व मारांतून मुक्त होण्याकरितां आड, विहीर जवळ करिते. असा एखादा भयंकर परिणाम झाला ह्मणजे मग तो ह्यातारा नवरा अधोमुख होऊन कोंपऱ्यांत रडत बसतो. पश्चात्ताप पावतो, देवाची आठवण करितो:—

देवा, मला कोठून रे अशी बुद्धि झाली! तरुण बायकोशीं संसार करण्याचें सामर्थ्य मजमध्यें आहे कीं नाहीं याचा आधीं मीं विचार केला नाहीं. कूळ, शील पाहून मग मुलगी करावी अशी जी वडिलांची ह्मण, तिचा मी मुळींच विचार केला नाहीं. माझे विश्वासू मित्र मला सांगत होते त्यांचें मी ऐकिलें नाहीं. अव्हेर केला. याजमुळें माझी अब्रू गेली, संसाराची दैना झाली, पैशापरी पैसा गेला आणि बायकोही गेली, आतां मी लोकांस तोंड तरी कसें दाखवूं! मीच होऊन आपल्या हातीं आपली फटफजिती करून घेतली!!! शिव! शिव! शिव! देवा, कशीरे मला अशी बुद्धि झाली. तुझी मर्जी! दुसरें काय!!!

### आर्या

सौख्याशेनें पुनरपि अज्ञानें नव विवाह लावियला ॥
मूर्खत्वाचा झेंडा निजहस्तें जगभरींच नाचविला ॥ १ ॥

याप्रमाणें तो रडत बसतो.

म्हातारे बाबा! या गोष्टींचा विचार करा, तुम्हास हें उपदेश पत्र लिहिलें याचा विषाद अगदीं मानूं नका. या आमचे पत्रांतील गोष्टीचें बिन्छान्यावर शयन कराल त्या समयीं शांतपणें चांगलें मनन करा, म्हणजे जगदीश्वर ज्यांत खरें हित तुमचें आहे, तेंच तुम्हांस करण्याविषयीं बुद्धि देईल.

आतांच आम्ही एक हकीकत ऐकली ती तुम्हांस सांगतों. आमचे ओळखीचा एक गृहस्थ आहे. त्यानें दोनशें रुपये भरून दुसऱ्यानें लग्न केलें. या लग्नास सुमारें पांच वर्षे झालीं असावींत. सांप्रत त्या गृहस्थाची बायको शेजारच्या एका विद्यार्थ्याबरोबर घरांत चोरी करून पळून गेली आहे. हा ग्रहस्थ धनवान व सभ्य चालीचा आहे, घरांत सर्व कांहीं आहे, पण उपयोग काय? कांहीं कांहीं ठिकाणीं अशा स्थळीं वर आच्छादन असतें त्याखालीं पाप दबून रहातें, पण कांहीं ठिकाणीं आच्छादन उडून जातें व अब्रुदार गृहस्थाची अशी फटफजिती होते. या गृहस्थाचें वय ५० वर्षांपलीकडे नाहीं.

वैद्यशास्त्रदृष्ट्या विचार केला तर कांहीं लोकांचें मत असें आहे कीं, तरूण पत्नीचे संगतीनें तिचे आंगांतील (वीज) पतीचे आंगांत येऊन त्यास थोडीशी पुष्टता येते, पण एका बाजूनें जरी पुष्टता येते असें दिसतें, तरी दुसरे बाजूनें धातुक्षयाचा व नामर्दपणाचा रोग पतीस जडतो, आणि त्यायोगें त्याचा लवकरच अंत होतो, असें सर्व वैद्यकांचें मत आहे.

असें समजा, दोन मल्लांस आपल्या आयुधांसह एकमेकाशीं कुस्ती खेळण्यास सांगितलें आहे, पहिल्याचे हातांत खंड, विखंड तांब चढलेलीं मोडकीं आयुधें आहेत व दुसऱ्याचे हातांत नवीं करकरीत, ताजीं आयुधें आहेत, तर या कुस्तीचा जो परिणाम व्हावयाचा तोच येथें व्हावयाचा, यांत अगदी संदेह नाहीं.

कधीं कधीं तर पुढें असें होतें कीं, मुलाकरतां ह्मणून जी बायको करावी ती मग आसपासचे मुलांकरतां होते. असें झालें ह्मणजे मग नवऱ्यास फार खेद होतो.

महाराज, या सर्व गोष्टींचें मनन करून तुह्मीं आपल्या मनांतील लग्न करण्याचे विचार अगदीं काढून टाकून परलोक सुखाकडे आपलें लक्ष लावा, तीर्थयात्रा करा, तुमचे धर्मसमजुतीप्रमाणें ब्राह्मणसंतर्पण करा, एखादा मुलगा पाहिजे तर दत्तक घ्या, आणि त्याचा संसार करा आणि तेंही पसंत नसेल तर नवीन विचारांप्रमाणें आपले गांवच्या एखाद्या विद्यार्थ्यास स्कालरशिप देऊन तुमचे नांवानें ' जपान ' येथें एखादी कला शिकण्याकरतां पाठवा. या यत्नाची आपल्या देशास फार जरूर आहे. तेंही मान्य नसेल व भर ज्वानींत वाईट सवय लागली असेल, मनास आवरण घालण्याचें सामर्थ्य नसेल, आपले सत्तेचें माणूस पाहिजे असें वाटत असेल, तर पुणें मुंबई येथें व इतर गांवीं अनेक ( रूप गुणसंपन्न ) स्त्रिया विधवा झाल्या आहेत त्यांतील एखादी योग्य वयाची पाहून तिच्याशीं लग्न करा. पुष्कळ सुधारणा इच्छिणारे लोक तुमचे पंक्तीस भोजनास येतील, अशा प्रकारें लग्न केल्यास वैधव्य दुःखांत बुडालेल्या एखादे गाईस बाहेर काढल्याचें तुह्मांस पुण्य लागेल.

ह्मातारेबोवा, या वर सांगितलेले मार्गांतून तुह्मांस एकही मार्ग पसंत न पडतां जर वर्तन विरुद्ध कराल तर आह्मी तुमचे हिताकरतां स्वच्छ सांगतों कीं, अंतीं फसाल बरें! मग तुमची अब्रू जाईल, लोकांत छी, थू होईल आणि मग तुह्मांस तोंड दाखविण्यास सुद्धां जागा राहणार नाहीं अशी दशा होईल, हें ध्यानांत ठेवा.

## एका अनुभविक वृद्ध कवीची उक्ती.

सुलग्न सावधान, राम बोलो भाईराम, सुलग्न सावधान ॥ छ ॥ साठीची बुद्धी नाटी, हातीं घेउनीयां काठी, वसवसोनी लागे पाठी, त्याला हांसती कारटीं ॥ १ ॥ सुलग्न सावधान, राम बोलो भाई राम, सुलग्न सावधान.

### केका.

नसोनि शक्ती अंगीं, वयही साठीं बा लोटली,
तनू पिकुट भोपळ्या सम दिसे तुझी कोठली,
अशास तुज कासया नवरि पाहिजे बोकडा,
अहा! तरुण पद्मिणी फुकट बांधिली लांकडा ॥ १ ॥

# युरोपचे इतिहासांतील कांहीं हकिकत.

१८७५

रोम येथील राजाचे वंशावळींत ‘ नीरो ’ आणि ‘ कालीगुला ’ नांवाचे बादशहा होऊन गेले. त्यांनीं आपल्या राज्यांत असा कायदा केला होता कीं, अमुक वय होऊन गेल्यावर जे ह्मातारे शिल्लक राहतील त्यांस, ते देशाचे धनाचा दुरुपयोग करितात सबब अशा अनुत्पादक लोकांस पकडून राजाचे शिकारखान्यांतील हिंसक जनावरांपुढें टाकून मारून टाकावें. त्या वेळचे लोकांचें असें ह्मणणें असे कीं, ह्मातारे हे देशास उगीच पोसावे लागतात; आणि ते गरिबीनें स्वस्थ बसत नाहींत, अनन्वित कामें करितात, याजकरितां त्यांस मारून टाकावें.

यूरोपखंडाचे सर्व इतिहासांत स्पार्टन लोकांसारखे स्वदेश भक्त दुसरे लोक नाहींत. त्यांच्यांतील एक ह्मण अशी आहे कीं, जोंपर्यंत देश परसत्तेखालीं आहे, तों पर्यंत सर्व लोकांनीं सुतक पाळावें; ह्मणजे ऐषआरामाचा अगदीं त्याग करावा. ह्मातारपणीं लग्न करणें एक प्रकारचा रतिसुखाचा ऐषआरामच होय. भर ज्वानींत प्रत्येक माणसास विषय सुखाची उत्कंठा असते; हें मनुष्य स्वभावास साधारण आहे तशी स्थिति ह्मातारपणीं मुळींच नसते. त्या काळीं आत्म विचाराकडे मन लावणें हेंच प्रत्येक ह्माताऱ्याचें ह्मातारपणचें कर्तव्य आहे. तें सोडून जे अविचारी ह्मातारे आपल्या आत्मघाताकडे ह्मणजे कामविकाराकडे मन लावितात त्यांस उपमा देण्यास भाषेंत शब्द नाहीं. स्पार्टन लोकांत दुसरी

अशी ह्मण आहे कीं, जे लोक परसत्तेखालीं आपला देश असतां अशा प्रकारचीं सुखें भोगून मिशावर हात फिरवितात ते आपल्या आईच्या स्तनावर हात फिरवितात असें समजावें. अशा लोकांचा ते नाश करित असत. त्या लोकांत निरुपयोगी, अनुत्पादक लोकांस अगदीं थारा मिळत नसे. त्याचप्रमाणें लहान मुलांविषयीं त्यांच्यांत असा कायदा असे कीं, मूल जन्मास आल्यावर त्यास प्रथम सरकारी डाक्टरकडे तपासणीस न्यावें लागत असे, डाक्टरचे तपासणींत जर तें सशक्त ठरलें तर त्यास आईबापाचे हवालीं करित, व पुढें त्या मुलाचे जोपासनेसाठीं सरकारांतून कांहीं वार्षिक नेमणूक करून देत. पण जीं मुलें अशक्त ठरत त्यांस मारून टाकित; असा कायदा त्यांचा देश पर सत्तेखालीं असतांना होता. अशा देशांत ह्मातार्‍यास लग्न करण्याचा अधिकार कोठून प्राप्त होणार ?

जर्मनींत, विद्यमान कालींही असा कायदा आहे कीं, कोणाही माणसास लग्न करणें तर सरकारची परवानगी घ्यावी लागते. ह्मातारे माणसापासून जी प्रजा होते ती बहुतकरून अशक्त असते, यामुळें ती देशाला व्यर्थ पोसावी लागते. याजकरितां डाक्टरचे तपासणींत ठरेल त्याप्रमाणें हरएक माणसास लग्नाची परवानगी मिळते.

साधारण असा नियम आहे कीं, जो कोणी मनुष्य विष प्राशन करील, तोच मरण पावेल, दुसर्‍याशीं त्याचा कांहींएक संबंध नाहीं; पण वृद्धापकाळीं कामवासनेचे आधीन होणें हें विष अशा प्रकारचें जलाल आहे कीं, तें घेणाराचाच नाश करून रहात नाहीं, तर तें घेणाराचे कुळाचा, त्याचे

पुत्रपौत्रांचा, तो जर राजा असला तर त्याचे राज्याचा, त्याचे प्रजेचा नाश करूनही थांबत नाहीं; तर त्याचे पुढें त्याचे पत्नीचे एकपतिव्रताचा नाश करितें. कांहीं स्थळीं तर तीस संततीकरितां परदार गमन करणें सुद्धां भाग पडतें. इतका भयंकर परिणाम त्या ( कामविषा ) पासून होतो. याजकारितां वृद्धमाणसांनीं लग्नाची इच्छा मनांत आणणें फार फार भयंकर आहे. आणि एखादे गरीब मुलीस ( तिचे बापास धनाची लालूच दाखवून ) ह्यातान्यानें कधींही बुडवूं नये व आपलाहि नाश करून घेऊं नये. व गावकऱ्यांनींही अशा अधमाचा धिःकार करून त्यास परावृत्त करावें.

असा प्रसंग ज्या ज्या वेळीं कोणतेहि गांवीं येईल, ह्मणजे ह्मातारा लग्नास तयार होईल, त्या समयीं तेथील लोकांनीं निदान त्या अज्ञान मुलीची दया मनांत आणून तरी ( कसायाचा ) व्यापार करणाऱ्या त्या पालकास किंवा बापास, व धनानें मोहित करणाऱ्या त्या थेरड्यास साम, दाम, दंड, भेद या कोणतेही मार्गें प्रतिबंध करून लग्न होऊं देऊं नये. व अशा प्रकारचें जर लग्न मोडलें तर त्यांत यत्किंचितही पाप नाहीं. उलट पुण्यच आहे. असो; त्या यत्न करणाऱ्या परोपकारी गृहस्थास तो ह्मातारा आरंभीं पुष्कळ त्रास देईल; त्याजवर खोटे नाटे दावे सुद्धां धनाचे मदतीनें व लबाड लोकांचें साह्य घेऊन आणील, त्या ह्मातान्यास त्यावेळीं त्यांचें हें वर्तन व प्रयत्न विषासारखे देखील वाटतील, हें उघडच आहे. पण तुह्मास ठाऊक आहे कीं, वायु झालेल्या माणसास आपण मात्रा घालित असतां तो हात झिडकारून टाकितो असें आपण दररोज पाहातों. परंतु खरे कळवळ्याचे जे इष्ट मित्र

व गांवकरी असतात, ते त्यास उताणा पाडून लोखंडाचे पळीनें त्याची बसलेली दांतखिळी उचडून आंत रसायन घालितात, आणि त्या योगानें पुढें त्याचा वायु उतरून सावध झाल्यावर मग त्या सर्वांपाशीं तो क्षमा मागतो. त्यांचे उपकार स्मरतो, त्याप्रमाणें अशावेळीं जर कोणीं हें लग्न मोडण्याची खटपट केली तर ते तशा स्तुतीस दोन्ही पक्षांकडून व सर्व गांवकरी लोकांकडून पात्र होतील यांत अगदीं संदेह नाहीं. पण असें पवित्र काम करितांना थोडासा मनाचा निग्रह कांहीं मंडळीचे अंगीं लागतो; तो असल्यास हें पवित्र कार्य झाल्याशिवाय राहावयाचें नाहीं.

उद्योगाः सहासं धैर्यबलं बुद्धी पराक्रमाः ।
शऽते यत्र तिष्ठति तत्रदेवो पिशंकते ॥

# भारत ग्रंथाचें सार.

दिवा पश्यति नोलुको, काको नक्तं न पश्यति ।।
अपूर्व वृद्ध कामांधो, दिवा नक्तं न पश्यति ।। १ ।।

( उलुक ) पक्षी ह्मणजे घुबड यास दिवसास दिसत नाहीं, आणि ( काकपक्षी ) ह्मणजे कावळा यास रात्रीं दिसत नाहीं, पण नवल हें आहे कीं, जो ह्मातारा कामांध होऊन ह्मातारपणीं लग्न करितो त्यास दिवसाहि दिसत नाहीं आणि रात्रीहि दिसत नाहीं; अशी त्याची अवस्था होते.

कामविषाचें भयंकर वर्णन मी जें वर केलें आहे, तशी कथा ज्या **भारत** ग्रंथास आपण सर्वमान्य ग्रंथ मानितों त्यांत आहे. थोडक्यांत सांगितलें तर त्या उदाहरणांतील ह्मातार्‍यानें तें कामवासनेचें विष प्राशन केलें नसतें, तर भारतासारखा महान ग्रंथ लिहिण्यास व्यासास कारण सुद्धां झालें नसतें. इतकेंच नाहीं, तर कौरव पांडवांचें युद्ध झालें नसतें आणि दोघांकडील मिळून जें पंचवीस क्षोणी दळ समरांगणांत खर्ची पडलें, तें सुद्धां पडलें नसतें. इतका त्या विषापासून पुढें अत्यंत भयंकर परिणाम झाला आहे. आतां तें विष कोणतें व कोणी घेतल्यामुळें हा भयंकर परिणाम झाला ती कथा आपल्यास थोडक्यांत सांगतों.

**पांडवांचा** मूळ पुरुष कुरु कुळांतील जो जन्हुराजा त्याचे वंशांत जन्मलेला “ शंतनु राजा ” हा होय; आणि त्यानें तें काम ( रतिसुख ) विष ह्मातारपणीं कोळ्याचे मुलीशीं लग्न करून प्राशन केलें आणि त्याचा भयंकर परिणाम पुढें झाला तो असा:—

**शंतनुचा** पुत्र **भीष्म** हा सर्व तऱ्हेनें योग्य, रणशूर असा असतां त्याचे लग्नाचा विचार करण्याचें सोडून देऊन शंतनुराजा कोळ्याचे घरीं वाढलेल्या मुलीस मोहित झाला, आणि त्या योगें तिचें त्यास वेड लागल्यासारखें झालें. ती उपवर मुलगी या ह्मातान्या शंतनूस वश होईना. इकडे राजा दिवसेंदिवस अशक्त होत चालला, कारभार पाहिनासा झाला. ही सर्व हकीगत भीष्मास समजतांच तो त्या पोरीकडे गेला. तिणें आपल्यास बापाची अनुकुलता नाहीं, हें कारण सांगितलें. नंतर भीष्मानें तिच्या बापाची मनधरणी करून शेवटीं भीष्मानें जन्मपर्यंत ब्रह्मचर्य व्रत स्वीकारावें तर माझी मुलगी तुझी आई होईल, **शंतनूला** वरील, असें ठरलें.

पुढें प्रसिद्धपणें ब्राह्मण समुदायासमक्ष भीष्मानें ब्रह्मचर्य दीक्षा धारण केली. आणि नंतर ती कोळ्याची अल्लड पोर हस्तनापूरच्या राजवाड्यांत राजाची राणी होऊन बसली. या राणीसाहेबांचें नांव सत्यवति साहेब असें आतां * झालें, आणि युवराज भीष्म; ते आतां ब्रह्मचारीबोवा होऊन अलग राहूं लागले.

एका कवीनें ह्मटलें आहे:—

सत्तराची हिच रचना ॥ बसल्यासीं उठवेना ॥
उठल्यासी चालवेना ॥ दिसे मग दैन्यवाणा ॥

अशा स्थितींत पुढें शंतनुपासून सत्यवतीस अशक्त मरतुकडे असे दोन मुलगे झाले. त्यांचीं नावें चित्रांगद आणि विचित्रवीर्य. व हेच पुढें शंतनूनंतर गादीवर बसले.

---

* 'राजानी राणी आणि छाणा विणता आणि' अशी गुजराथींत ह्मण आहे.

युवराज विचित्रवीर्य हे तर विचित्रवीर्याची खरी प्रतिमा होतां असें ह्मणण्यास हरकत नाहीं. मुलगे मोठे झाल्यावर त्यांचीं लग्नें केलीं, परंतु रुपयौवन संपन्न शंतनूच्या या स्नुषांनां संतती मुळींच झाली नाहीं. इतक्यांत शंतनु स्वर्गस्थ झाले; पुढें पहिले पुत्र चित्रांगद हे चित्रसेन नांवाचा गंधर्व हस्तनापुरावर चालून आला असतां त्याच्याशीं लढतांना मारले गेले, आणि दुसरे विचित्र वीर्यही थोडेच काळानें कफक्षय होऊन निजधामास गमन करिते झाले.

ह्या नारपणचे लग्नाचा असा हा परिणाम झाला! आतां राजवाड्यांत शिल्लक माणसें ह्मटलीं ह्मणजे सत्यवती सासुबाई आणि त्यांच्या त्या दोन विधवा सुना अंबिका आणि अंबालिका, आणि राजवाड्याबाहेर राहणारे ते ब्रह्मचारी बुवा, (यांची गणना आतां राजकुलांत नाहीं हें तुह्मी जाणतच अहां) सत्यवतीच्या डोळ्यांदेखत तिचा पती व दोन पुत्र मेले. सुना विधवा झाल्या, राजगादीवर स्थापन करण्यास कोणी औरस वारस राहिला नाहीं. अशा वेळीं तिचे दुःखाची कल्पना करणें कितीतरी भयंकर आहे. करते काय बापडी? ह्यातान्याचे संयोगाचा असाच परिणाम व्हावयाचा? पुढें तिनें भीष्मास बोलावून आग्रहानें सांगितलें कीं, ज्या प्रमाणें पित्याचे इच्छेकरितां तूं ब्रह्मचर्यव्रत धारण केलेंस त्याप्रमाणें माझे इच्छेकरितां माझे सुनांशीं संभोग करून पुत्रप्राप्ति करून दे.* त्यानें आईस सांगितलें कीं, ही गोष्ट

*'देवराज सुतोत्पत्ती' अशी त्या काळीं धर्मशास्त्राची आज्ञा होती. हल्लीं वऱ्हाडांत कांहीं क्षत्रिय जातींत विधवा भावजयींशीं लग्न

मात्र मजकडून कधीं घडावयाची नाहीं. या बाबतींत मातेच्या आज्ञाभंगाचा दोष मीं पतकरीन; परंतु जी मी दीक्षा घेतली आहे तिला भ्रष्ट करणारी क्रिया मी कधींहि करणार नाहीं. **प्राडविवाक** या नात्यानें कारभाऱ्याचें काम जन्मपर्यंत करीन. हस्तनापुरावर कोणी शत्रू आला तर त्याला शिक्षा करीन. पण माते, मला अशी आज्ञा देऊं नको. याप्रमाणें ब्रह्मचारीबावा कबूल होईनात, तेव्हां भारतग्रंथाचे कर्ते कृष्णद्वैपायन यांस बोलाविलें आणि त्यांस सुनांशीं नियोग * करून पुत्रप्राप्ति करण्याविषयीं आग्रहानें सांगितलें. शेवटीं त्यांनीं ती गोष्ट मोठ्या कष्टानें कबूल केली. वडील सून ऋतुमती झाल्यावर दोघांची गांठ घातली. परंतु व्यासांचें तें भव्य शरीर व तेजोमूर्ति पाहून ती सून अगदीं दिपून गेली. आणि तिनें डोळे मिटले. अशा स्थितींत व्यवहार झाल्यामुळें पुढें पुत्र झाला तो जन्मांध झाला. त्याचें नांव धृतराष्ट्र असें ठेविलें. आंधळा गादीवर बसण्यास योग्य नाहीं तेव्हां सत्यवतीनें व्यासास पुन्हा पाचारण केलें. झालेला वृत्तांत निवेदन केला. झाल्या गोष्टीस इलाज नाहीं. पण गादी वारसाविणें रहाणें चांगलें नाहीं. कुलक्षय होईल. याजकरितां माझें सांगणें आहे कीं, दुसरे सुनेस भोग द्यावा. तेंही व्यासानें कबूल केलें. पण वडील सवतबाईनीं त्यांच्याशीं झालेले पूर्व प्रसंगाची हकिकत धाकट्या सवतबाईस साद्यंत सांगितली होती; ती ऐकून त्या अगोदरच घाबरल्या होत्या. त्या भव्य पुरुषाचे आंगांतील ( वीज ) आपल्या आंगांत उतरली तर शरीरांस फार दाह होईल, तो

---

करितात. रामानें सुग्रिवास वालीचे बायकोशीं संबंध ठेवण्यास आज्ञा दिली होती.

आपल्याच्यानें कधीं सहन होणार नाहीं. ह्मणून आंगास चंदन लाऊन बाईसाहेब एकांतांत गेल्या ( कांहीं पुस्तकांत व्यासाकडे पाहून ती घाबरून एकदम पांढरीफिक्की पडली आणि त्याचा परिणाम गर्भावर झाला असें लिहिलें आहे ). त्याचा परिणाम पंडुरोगी मुलगा झाला. त्याचें नांव **पंडु** असें टेविलें. हाच पांडवाचा पिता, तिसरे वेळीं दासीपासून विदूर झाला. याप्रमाणें पूर्व हकिकत आहे.

पुढें धृतराष्ट्र व पंडु मोठे झाले. दोघांचीं लग्नें झालीं. पंडुराजाचे बायकोचें नांव कुंती. पण **पंडुराजा** रोगी असल्यामुळें स्त्रीसंभोग करण्याची त्यास सक्त मनाई होती. कारण पंडूचे वीर्यापासून जी प्रजा उत्पन्न होईल ती " यथा बीजं तथांकुरं " या नियमाप्रमाणें रोगी ह्मणजे हल्लींचे प्रचारांतील शब्दाप्रमाणें बोलणें ह्मणजे ती देशास भार होईल, त्या प्रजेच्या हातून राष्ट्राला योग्य अशीं पुरुषार्थाचीं कामें होणार नाहींत; याजकरितां त्यास स्त्रीसंग न करण्याची सक्त ताकीद होती.

पूर्वकाळीं प्रजेचे आरोग्याकडे त्या वेळच्या विद्वान् लोकांचें फार लक्ष असें. ते अशी प्रजा उत्पन्न होऊं देत नसत. सांप्रत मुसलमान पारशी यांच्यांत एक दूध खेरीजकरून सख्ये चुलत बहीणभावंडांचीं लग्नें होतात आणि असा शरीरसंबंध, ते अनेक सोईकरितां मुद्दाम देखील करितात. पण त्यापासून प्रजेच्या आरोग्याची फार हानि होते, संतती निर्बल होत जाते. हे दूरवर विचार मनांत आणून आमच्या याज्ञवल्क्यादी ऋषींनीं सगोत्र सपिंडांतील शरीरसंबंध अगदीं वर्ज केले आहेत ते याच चांगले हेतूकरितां होत. त्याचप्रमाणें

याज्ञवल्क्य यांचे पुस्तकांत " अनभ्यासें विषं शास्त्रं वृद्धस्य तरुणी विषं " असें स्पष्ट सांगितलें आहे.

पंडुराजाची बायको कुंती हिला वरून चालत आलेल्या रीतीप्रमाणें पांच गृहस्थांकडून मंत्ररूपानें पांच मुलगे आणि कुमार अवस्थेंत **कर्ण** असे सहा मुलगे झाले. याप्रमाणें शतंनु पासून पांडवांपर्यंतची एकंदर हकीगत आहे.

या एकंदर चरित्राचा परिणाम पुढें कसा काय झाला याचा आपण विचार करूं.

शंतनुराजानें आपलें लग्न म्हातारपणीं केलें नसतें तर पुढें ज्या भयंकर, अनीतीच्या गोष्टी घडल्या त्या कधींच घडल्या नसत्या; भीष्मासारख्या राजपुत्रास; ऐन पंचविशींत, जो भीष्म त्या वेळच्या पृथ्वींत खरा शूर, खरा योद्धा होता, ज्यानें परशुरामासारख्या एकवीस वेळां निक्षत्रीय पृथ्वी करणाऱ्या वीरांस युद्धांत नमती घेऊन साम करून परत जाणें भाग पाडलें, ज्यानें **गोपाळ कृष्णाची** प्रतिज्ञा भंग करून त्यास चक्र धरण्यास लाविलें, अशा धनुर्धारी महावीरास भरज्वानींत ब्रह्मचर्य दीक्षा घ्यावी लागली ती लागली नसती. त्याचप्रमाणें चित्रांगद व विचित्रवीर्य यांस अशक्त भस्मरोगी अल्पायु स्थितींत जन्म घेणें भाग पडलें तें पडलें नसतें. आणि अकालीं मरणाधीन होऊन सत्यवती पुत्रशोकांत बुडाली नसती. त्यांच्या बायकांस पुत्रप्राप्तीकरितां परपुरुषाशीं रत व्हावें लागतें ना. बरें इतकेंही करून परिणाम काय? तर एक पुत्र आंधळा आणि दुसरा पंडुरोगी. " एका डोळ्यांत वडस तर दुसऱ्यांत कांहीं नाहीं, ' असा प्रकार झाला तो झाला नसता. व त्याचा परिणाम पुढें पंडुराजास

मराठी ग्रंथ संग्रहालय

मरेपर्यंत संसारसुखास पराङ्मुख व्हावें लागलें, तें लागलें नसतें. इतकेंच नव्हे, तर कुंतीला [illegible] पुत्रापासून प्रजा उत्पन्न करून घ्यावी लागली [illegible] या सर्वांस कारण शंतनूनें ह्मातारपणीं कामाचें [illegible] केलें, हेंच नव्हे काय. व त्या योगानें पुढेंही सर्व माणसें दुःखांत बुडून सर्व नाश झाला नव्हे काय ?

जर शंतनु, कोळ्यानें वाढविलेल्या मुलीस मोहित झाला नसता, तर भीष्माचें लग्न झालें असतें, शंतनु नंतर भीष्म राज्यावर विराजमान झाला असता, आणि प्रजाजनांचें उत्तम पालन करता, त्यास काशी राजाची वडील मुलगी अंबा, जिणें खडतर तपाचरण भीष्मास मारण्याकरितां केलें, आणि दुसरा जन्म घ्यावा लागला तरी घेऊन शेवटीं भीष्मास भर युद्धांत मारीन अशी प्रतिज्ञा करून मारला, तो तिणें कधीं मारला नसता. याचे उलट तिणें मोठ्या प्रेमानें त्याच्या गळ्यांत माळ घातली असती. दोघे आनंदानें सुखांत राज्याचा उपभोग घेतीं, कौरव पांडवांची उत्पत्ती अशा भानगडीनें झाली ती झाली नसती. कौरव पांडव हे सखे चुलत भाऊ असतां एकजण चुलत भावजईस भरसभेंत आणून नग्न करण्याचा यत्न करतो तर विरुद्ध पक्षांतील दुसरा भाऊ आपल्या चुलत भावाचे छातीवर बसून व्याघ्र सिंव्हादी हिंसक जनावरांप्रमाणें त्याचे नरडीस तोंड लावून भावाचें रुधिर गटगटा पितो; अशीं आंगावर कांटा उत्पन्न करणारीं भांडणें, जर शंतनु कामाधीन झाला नसता, तर कधीं उत्पन्न

---

१ या एकंदर कथेवरून सूक्ष्म विचार केला तर असें दिसतें कीं, दुर्गुण, रतोबरावर संततींत देखील उतरतात. शंतनु विषयांध झाला

झाली नसती, आणि कौरव पांडवांचें दोन्हीं पक्षांचें मिळून पंचवीस क्षोणी दळ रणांत निजलें तें जिवंत राहिलें असतें.

॥ विषमेका किनंहंती कामविश पुत्रपौत्रकं ॥
॥ नविषंविषमित्याहु विषंकामस्य उच्यते ॥

याप्रमाणें भयंकर परिणाम कामापासून झाला, त्या सर्वांस कारण म्हातारपणीं लग्न करणें हेंच होय. या शिवाय दुसरें कांहींएक नाहीं; असें तुमचे चांगलें ध्यानांत आलें असेल.

ही सर्व भारतांतील आणि तशांत महा पराक्रमी भीष्माचे बापाची हकीकत सांगून, माझे प्रिय गांवोगांवचे लोकांस अशी विनंती करितों कीं, बंधूंनो जर तुमचे गांवीं कोणा म्हाताऱ्यास म्हातारचळ होऊन बाशिंग बांधून तो रुखवत खाण्यास तयार झाला तर या माझे पुस्तकांतील सर्व हकीकत व याशिवाय योग्य अशी तेथील ग्रामस्थांस वाटेल, ती त्यास निवेदन करा. मला वाटतें, त्याचे मनास यापासून उपरती होईल. पण कितीएकांस उपरती जर न झाली, जरी त्याचें मन फिरलें नाहीं, तरी गांवकऱ्यांनीं हताश होऊं नये. हरएक प्रयत्न करून त्याचें लग्न होऊं देऊं नये. यांतच त्या

---

हें अगदीं निर्विवाद आहे. पुढें त्याचा मुलगा धृतराष्ट्र हा अंध होता याजमुळें त्याचें चरित्र दुनियेपुढें येण्यास मार्ग नव्हता. पण त्याचे पुत्र दुर्योधन दुःशासनादि यांचें मन कामविकाराधीन होतें. हें भारत सांगत आहे. याजवरून मनाचे विकार रेतांत उतरतात यांत संशय नाहीं व प्रत्येक कुटुंबाचे नायकानें आपलें बाहेरील आचरण शुद्ध ठेवावें इतकेंच नाहीं, तर आपलें मनही पवित्र राहणेविषयीं काळजी घ्यावी. तरच प्रजा पवित्राचरणी उत्पन्न होईल. कारण मनाचा आणि रेताचा फार निकट संबंध असतो. हें सर्वांनीं ध्यानांत ठेवावें.

ह्यातान्याचें कल्याण आहे. तें त्यास त्यावेळीं दिसणार नाहीं. पण पुढें खचित् त्यास दिसेल. आणि मग तो तुझा परोपकारी गांवकऱ्यांचे उपकार मानील. शंकराचार्यांच्या शिष्यांनीं शंकराचार्यांस एकदां असा प्रश्न केला कीं, आम्ही मित्र कोणास समजावें. त्यास स्वामीनीं उत्तर दिलें कीं, जो वाईट आचरणापासून प्रेमभावानें स्वतःला त्रास सोसून देखील आपले मित्राचें रक्षण करतो; त्यासच मित्र असें समजावें. बाकी भोजनबंधू मित्र जाणावे.

कोमित्रा ? यो निवारयति पातात्.

# वृद्धपणीं लग्न करूं इच्छिणारे म्हाताऱ्याचें मन परावृत्त होण्यास गांवच्या लोकांनीं कसा यत्न करावा.

प्रथम हें पुस्तक वाचावें. नंतर आपल्या मित्रांशीं विचार करून लग्न करूं इच्छिणारे म्हातारेबावास पुस्तकाचे आरंभीं " म्हातारे नवरदेवास पाठविण्याचें पत्र " याचा नमुना लिहिला आहे. त्यांतील मजकूर व गांवांत विधुर स्थितींत राहिलेल्या गृहस्थांचीं योग्य असतील तितकीं उदाहरणें देऊन व दुसऱ्या कांहीं अनुकूल गोष्टी असतील त्या लिहून पत्र पाठवावें. त्यानें उपयोग झाला नाहीं तर म्हातारेबोवाचे स्नेह्यांनीं—इष्ट मित्रांतील चार गृहस्थांनीं एकत्र मिळून डेपुटेशन रूपानें त्याजकडे जावें किंवा त्यास गांवचे देवळांत गांठून अशा लग्नापासून काय परिणाम होतात तें सर्व नीट समजूत घालून सांगावें.

पण इतकेंही करून तो हट्टानें मंडळीचें ऐकणार नाहीं, तर मंडळींनें निराश न होतां हिंमत धरून त्यास साफ सांगावें कीं, पहा, आजोबा आमचा उपदेश न ऐकतां जर आपण लग्न करीत असाल तर खुशाल करा, त्यांत आमचें कांहीं जात नाहीं. आमचे हातीं कांहीं राजसत्ता नाहीं कीं आह्मीं तुह्मांस प्रतिबंध करूं. तरी पण आह्मी तुह्मांस सांगतों कीं, आमचे हातीं जी सत्ता आहे व ज्या सत्तेचा उपयोग पवित्र कामांत करण्याचा अधिकार परमेश्वरानें प्रत्येक माणसास दिला आहे, तसा आह्मासही दिला आहे आणि याजकरितां सांगतों कीं एखाद्या अनाथ मुलीस बुडविण्यास,

तिचे जन्माचें मातेरें करण्यास, तिचे बापास पैशाची लालुच दाखवून जर आपण तयार झाला असाल, तर आमचा तो अधिकार अमलांत आणल्याशिवाय आह्मीं कधीं राहणार नाहीं.

मनुस्मृतींत लोकसमुदायाविरुद्ध वागणाराशीं गांवकऱ्यांनीं कसें वागावें याजबाबद असें सांगितलें आहे कीं,

त्यजेद्देशं कलौयुगे त्रेतायाम ग्राममुत्सृजेत ॥
द्वापारे कुळ मकेतु कर्तारं तू कलौयुगे ॥ १ ॥

ह्यातारे बोवा, आह्मी वरील वचनाधारें आपल्यास सांगतों कीं, आपण जर आमचें न ऐकतां लग्न करीत असाल तर आह्मीं मनूचे आज्ञेप्रमाणें अजन्मपर्यंत तुह्माशीं भाषण करणार नाहीं. याप्रमाणें साफ सांगावें ह्मणजे गांवकऱ्यांनीं जातवाल्यांनीं आपलें कर्तव्य केलें असें होईल.

याप्रमाणें यत्न केल्यावर खचित कार्य होईल अशी खात्री आहे. पण ह्यातारे बोवांचे खरे मित्रांनीं जुळवाजुळव करून उपदेश केला पाहिजे तरच कार्य होईल.

मित्राविना मनुज कूप जसा अभद्र ॥
तोयाविणें कि रजनीविण तो निशिंद्र ॥ १ ॥

या श्लोकाप्रमाणें मग ह्यातान्याची अवस्था होईल व मग तो या बोधाचा विचार करील व परमेश्वरही त्यास तशी बुद्धि देईल अशी खात्री आहे. पण असे खरे हितचिंतक यावेळीं पुढें आले पाहिजेत.

**आर्या.**

भीष्म, धृतराष्ट, विदुर, द्रोण, नृप, कृपासि, बोलतो लावी,
कीं समयीं न वदावी तरि मग केव्हां सदुक्ति बोलावी.

**श्लोक.**

काकः कृष्ण पिकः कृष्णको भेदो पिक काक योहोः
वसंत समये प्राप्ते काकः काकः पिकः पिकाहाः

# दोन म्हाताऱ्यांचे लग्नाची चमत्कारिक हकिकत.

पुण्यास एक आजोबा नातीचे वयाचे मुलीशीं लग्न करण्यास तयार झाले होते. ही हकीकत शेजाऱ्यापाजाऱ्यांस समजली तेंव्हां त्यांनीं त्या म्हाताऱ्यास बुद्धिवाद करून पाहिला. पण "मुर्खाला कहाणी" असा प्रकार झाला. नंतर एक दिवस (लग्नाचे पूर्वीं) गाढवावर एका जख्ख म्हाताऱ्यास व पुढें एका लहान मुलीस बसवून या नवरदेव म्हाताऱ्याचे घरापासून वाजंत्री ताशे ब्यांड व मागें पोरांचा घोळका व गोंगाट अशा थाटानें मिरवणुक काढली. त्याचा परिणाम असा झाला कीं, त्या म्हाताऱ्यास उपरती होऊन त्यानें रुखवत खाण्याचा बेत पुढें रहित केला.

दुसरी गोष्ट अशी आहे, सातारा जिल्ह्यांत एके खेडेगांवीं मुलीचे आईस एका विधवेनें लालुच दाखवून दोनशें रुपयांस एका म्हाताऱ्यास मुलगी देण्याचें साटें केलें. ही हकिकत मुलीचे भावास समजली तेंव्हां तो आपल्या गांवीं आला व आईस पुष्कळ प्रकारें सांगितलें; पण ती मध्यस्त विधवा तिचें मन वळूं देईना. मुलगी म्हाताऱ्याशीं लग्न करण्यास खुशी नव्हती.

नंतर लग्नाचे दिवशीं म्हातारेबोवा मुंडाधळ बांधून घोड्यावर बसून गालबोट लावून मांडवांत आले. भावानें बाहुलें वगैरे फोडून टाकून बहिणीस बरोबर घेऊन तो परगावीं निघून गेला. मग इकडे गांवकऱ्यांनींही म्हातारेबोवांची बरीच संभावना केली व म्हातारेबोवा आले तसे परत गेले.

शैल्ये शैल्ये नामाणिक्यं मौक्तिकं न गजे गजे,
साधवो नहीं सर्वत्र चंदनं न वने वने ॥ १ ॥

पुस्तकांतून घेतलेल्या कविता.

# म्हाताऱ्या नवऱ्याचा तरुण पत्नीचे सहवासाचा अनुभव.

आर्या.

काम स्त्रीतें भारी, जाणुन बुधजन समस्त कां चुकला ॥
वरितो जो तरुणीला सांगे मी वृद्ध तो सुखा मुकला ॥ १ ॥
शृंकाया करवंटी नेसी पंचा खराच बुधवारीं ॥
कांपे कर थरथर हर नसती पारि या पिडेस बुध वारी ॥ २ ॥

श्लोक.

झाले झाले मदिय कच हे पांढरे शुभ्र झाले,
गेले गेले द्विज सकलही सोडुनी सत्य गेले ॥
लाळा कैसी मुखिची गळते शक्ती नाहीं उठाया,
आतां कैचें रतिसुख मला सत्यही भ्रांति वाया ॥ १ ॥
कानांनीं या नच पारसिवे मानही सांवरेना,
आतां याष्टि व्यतारिक मला सत्य हो चालवेना ॥
हस्तादि, हे थरथर पहा कांपती नित्य आतां
( खासे ) केली उचल ही किती नाहींवा कोणी त्राता ॥ २ ॥
देहा माझ्या किति सुरकुत्या येती या दैन्ययोगें,
वृद्धावस्थे नमन तुजला दे ही या शांतीभोगें ॥
नेत्रा आली किती शिथिलता कांहीं माते दिसेना,
भार्या सुद्धां मज निकट ती सत्य आतां बसेना ॥ ३ ॥
बाल्यावस्थेमधें किती तरी खेळलों खेळ नाना,
तारुण्यीं तै रमणीसह ग्या नित्य केल्या तनाना ॥
आनंदी त्या नच गणियले पुढल्या यात नाना,
वाटे चित्तीं हरिविण आतां मार्ग हा दैन्य त्राणा ॥ ४ ॥

वृद्धत्वीं या इतर जनते रामनामास ध्याती,
इंद्रीयेंही परी मम सदा प्रीयभार्येस गाती ॥
तृष्णा माझी अनुदिन पहा वाढते या सुखाची,
माझे भाग्यीं सुख मुळीं नसे भ्रांति ही हो फुकाची ।५।
पर्जन्यीं सुख तें वसंत ऋतुचें कैसें मिळे इच्छितां,
रात्रौ सूर्य कसा दिसेल गगनीं सांगा बरें तत्वतां ॥
वस्त्राला चिरडुं नये ह्मणुनी कां घालाल काष्ठ्यावरी,
वार्धक्यीं नव पत्नीसौख्य मग तें कैसें मिळे भूवरी ॥ ६ ॥
कोणाची ललना तसा तनय कोणी कुणाचें नसे,
दुःखाचा समभाग घेई ललना खोटें परी तें असे ॥
गोमाशा नव वासरुया असती ह्या शंका मुळींही नसे ॥
कंठीं घालिती प्रेमपाश सटव्या तारुण्य हें जें वसे ॥ ७ ॥
त्यांचें प्रेम पडे खरें शिथिल तें वृद्धाप्रती पहातां,
होती धुंद मदे मुळीं न बघती कांताकडे तत्वतां ॥
जाती कर्ण जसे त्यजून जठरा वृद्धत्व येतां तया,
ह्यातारा पती पहातां बधिर त्या होती पहा हो स्त्रिया॥८॥

# तरुण पत्नीचा म्हाताऱ्या नवऱ्याचे सहवासाचा अनुभव.

( अक्रुर हा नेतो श्रीकृष्णला — ही चाल )

धांव धांव प्रभो धाव सख्या भगवंता,
मज दुरधर जडली चिंता ॥
सांगुं कुणा तुजवांचुनि इतरांशीं,
दुःखें पिडिलें मजसीं ॥
आ विधवा मी हीन दीन परदेशी,
वय रुपची सासुरवासी ॥
॥ चाल ॥ नाहीं लेश सुखाचा मजला,
आनंद दीप कीं विझला
माझा रडून पदरही भिजला,
करुं तरि कैसी न सुचे कांहीं आतां ॥
मज दुरधर जडली चिंता ॥ २ ॥
आठवे वरुषीं माझें लग्न पहा झालें,
बहु वृद्ध पती योजीले,
साठ वरुषांचें वय त्यांचें मग कळलें,
आप्तवर्ग तिकडे वळले,
॥ चाल ॥ आयेचें कोणी न उरलें,
शतरुपयांसी मज कि केलें,
सर्व सौख्य त्वरितची सरलें
कधीं पाहिली कीं मज सम दुःखी दुहिता ॥
मज दुरधर जडली चिंता ॥ ३ ॥
काय सांगुं प्रभो दुःखस्थिति ही आमुची,
चगूक सासऱ्यांची

वद्वेना ते शब्द शिव्याचे देती,
तप्तलोह वदनीं हाणिती,
॥ चाल ॥ जरि चूक अल्पही घडली,
समजा मग विज कडकडली,
लांकडें पाठिवर पडलीं,
झडमार बहू होत शिव्यांची संथा
मज दुरधर जडली चिंता ॥ ४ ॥
आयबापांनीं अल्प वयांतचि त्यजिलें,
इतुक्यामाधिं विधवा झालें,
सासु श्वशुरांनीं नापिकासि आणविलें,
बारावे वर्षीं कच हारिले
॥ चाल ॥ मी लहान अज्ञकी अबला,
काय करिती नकळे मजला,
नापिक तो संनिध बसला,
मम मृत्यु कुठें तरि निजला,
सुख होतें तो याच घडिला येता
मज दुरधर जडली चिंता ॥ ५ ॥

केका.

असोत वरिशी दुजी तुज न लाज ही वाटली,
वरून पति येकला गतधवाच कां वाटली ॥
न दात मुखीं एकही तनु सकंप आली जरा,
हवी तरूण नोवरी परी तिला न अज्ञा जरा ॥